जा.क्र.2010/संगणक कक्ष/आव्य/कावि
**जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली**
दिनांक - 31/10/2011

**जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.**

**जाहिरात**

**क्र.2010/संगणक कक्ष/आव्य/कावि दिनांक - 31 /10/2011**

जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांचे कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, हिंगोली हे पद खुल्या वर्गातुन कंत्राट पध्दतीने भरण्याकरिता मुलाखत ठेवण्यात आले आहे.

**अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक 15/11 /2011**

**1) पदाचे नांव** :- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी
**2) पदसंख्या** :- 01
**3) ठोक वेतन** :- 22,000/- प्रती महिना या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय होणार नाहीत.
**4) कंत्राट कालावधी** :- 11 महिणे.
**4) शैक्षणिक अर्हता** :- पदवी / पदव्युत्तर (सामाजीक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन)
**5) अनुभव** :-

1) आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
2) मराठी व इंग्रजी भाषाचे चांगले ज्ञान असणे इष्ट.
3) टिप्पणी लेखन अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य.

वरील बाबींची पुर्तता होत असल्यास व प्रकल्प हाताळण्यास पुर्वानुभव असल्यास, अशा उमेदवाराचा सदर पदासाठी विचार केला जाईल.

**6) अर्ज करण्याची पध्दत :-**

1) उमेदवाराने आपले अर्ज मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली या पत्यावर **दिनांक - 15 /11/2011** पुर्वी पोस्टाद्वारे सोबतच्या नमुण्यातील अर्ज ए- 4 साईजच्या पांढऱ्या कोऱ्या टंकलिखीत / हस्तलिखीत सादर करता येतील. मात्र खाडोखोडीच्या ठिकाणी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करावा.

2) अर्जावर अर्जादाराची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

3) पात्र उमेदवारांनी **दिनांक - 15 /11/2011** पर्यंत (कार्यालयीन वेळेमध्ये, शासकीय सुट्ट्यांचे दिवस वगळून) अर्ज सादर करावेत. प्राप्त झालेल्या पात्र अर्जांचाच (विहित नमुन्यातील अर्जाचाच) विचार करण्यात येईल. उर्वरीत अर्जाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही. टपालाद्वारे पाठविण्यात आलेले अर्ज विहित मुदतीत या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. टपालद्वारे होणाऱ्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

4) पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल. सदर मुलाखतीची तारीख व वेळ या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर व http://hingoli.nic.in या जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**7) अर्जदाराचे अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे बंधनकारक आहे.**

01) शैक्षणिक अर्हते बाबत आवश्यक प्रमाणपत्रे.

02) शाळा सोडल्याचा दाखला.

03) आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र.

04) शासकीय कामाचा अनुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.

05) प्रकल्प हाताळण्याचा पुर्वानुभव असल्यास, त्याबाबतचे प्रमाणपत्र.

06) वय व अधिवास प्रमाणपत्र.

07) लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुना - अ मधील विहीत नमुण्यातील प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

**8) इतर सुचना**

1) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर खोटी सादर केल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

2) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांचे राहतील. तसेच निवड झालेल्या उमेदवारांस नियुक्ती देणे, जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

3) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने त्यांच्या नियुक्तीच्या आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन 07 दिवसात पदावर हजर व्हावे. अन्यथा त्यांची नियुक्ती आपोआप रद्द होईल व ते पुढील नियुक्तीस अपात्र ठरतील. तसेच निवड सुचितील प्रतिक्षा यादीनुसार पुढील पात्र उमेदवारास नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवाराने स्वखर्चाने रुजु होणे अनिवार्य आहे.

4) मुळ प्रमाणपत्रांची खारतजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु करुन घेण्यात येईल.

5) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

6) मुलाखतीस पात्र / अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी दिनांक - 21.11.2011 रोजी या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर व http://hingoli.nic.in या जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. **तसेच पात्र / अपात्र उमेदवारांना या कार्यालयाकडून कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :-**

उमेदवाराने आपला अर्ज खालील पत्यावर विहित मुदतीत पोहचेल अशा नोदणीकृत डाकेने / पोहच देय डाक नोंद टपालाने पाठवावा किंवा समक्ष दाखल करावा व त्या टपालाची / अर्ज दाखल केल्याची पावती जतन करावी.

**मा. जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,**
**नांदेड रोड हिंगोली**
**पिन कोड - 431513**
**दुरध्वणी क्रमांक - 02456-221450**

**स्थळ प्रतिवर मा.जि.अ. स्वाक्षरी असे**

**जिल्हाधिकारी हिंगोली,**
**करिता**